(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT / Vol. X / Issue – II ISSN 2277-8063

# डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या संसदीय कार्याचे विश्लेषण

संशोधक मार्गदर्शक, डॉ.लक्षटे आर. बी. सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक पदवी व पदव्यत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख देगलूर महाविद्यालय,देगलूर
संशोधक विद्यार्थी, सुमेद चापाजी गुंडेराव मु.पो.दिवशी बु. ता.भोकर जिल्हा-नांदेड

---

सारांश :

या शोध लेखात डॉ.जनार्धन वाघमारे यांनी राज्यसभेचे सदस्य म्हणून केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. मराठवाड्यातील सुधारणावादी व लोकशाही नेतृत्वाची परंपरा असलेल्या लातूर जिल्ह्यातून राजकीय वाटचाल करणारे डॉ.जनार्धन वाघमारे लातूरच्या राजकीय परंपरेला व संसदीय लोकशाहीच्या परंपरेला शोभेल असे कार्य व कर्तृत्व राज्य सभेत गाजवतात. जे वर्तमान व भविष्यातील राजकीय नेतृत्वाला मार्गदर्शक आहे.सदरील लेख डॉ.जनार्धन वाघमारे यांची दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ रोजी त्यांच्या घरी जाऊन मुलाखत घेऊन उपलब्ध झालेल्या साहित्याच्या आधारे लिहिला आहे. त्यामुळे त्यास सत्यता व अनुभववादाची धार आहे. डॉ.जनार्धन वाघमारे यांनी राज्यसभेचे सदस्य म्हणून संसदीय कामकाज व अन्य पातळीवर ही कार्यप्रवण संसद सदस्य म्हणून कार्य केले आहे.

१.प्रस्तावना

मराठवाड्यातील लातूर हा एक महत्वपूर्ण जिल्हा. लातूर ही राजकिय नेतृत्वाची खाण आहे. मा.विलासराव देशमुख, मा.शिवराज पाटिल चाकूरकर, मा.शिवाजीराव पाटिल निलंगेकर इत्यादि अनेक नेतृत्वांनी लातूर जिल्ह्याच्या विकासात व महाराष्ट्रात लातूरचा नावलौकीक केला. त्यासोबतच शैक्षणिक क्षेत्रातून डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या स्वरुपात एक नेतृत्व लातूर शहरातुन उद्यास आले. या नेतृत्वाने राज्यसभेचा खासदार म्हणुन सहा वर्ष काम केले, सहा वर्षाच्या काळात त्यांनी विविध विषयांवर अभ्यासपुर्ण मांडणी करुन अनेक राष्ट्रीय समित्यांवर काम केले. सदरील शोध निबंधाच्या माध्यामातुन त्यांच्या संसद सदस्य म्हणुन केलेल्या कार्याचे विश्लेषण केले आहे.

२.संशोधन लेखाचा उद्देश -

प्रस्तुत संशोधनपर लेख खालील उद्देशांना प्रमाणमाणुन लिहला आहे

१. डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या संसदीय कार्याचा व योगदानाचा अभ्यास करणे.

३.संशोधन लेखाचे गृहितक -

प्रस्तुत संशोधनपर लेख खालील गृहितकांना प्रमाणमाणुन लिहला आहे.

१. डॉ.जनार्दन वाघमारे यांचे संसदीय कार्य संसदीय लोकशाहीला मजबुत करणारे व भावी पीढीसाठी मार्गदर्शक आहे.

४.संशोधन पध्दती -

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सामाजीक शास्त्रातील संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. ज्यामध्ये ऐतीहासिक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. तसेच ग्रंथालयीन पध्दतीचा आधार घेण्यात आला. तसेच डॉ.जनार्दन वाघमारे यांची प्रत्यक्ष घेतलेली मुलाखत या लेखाचा प्रमुख आधार आहे



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

५.संशोधनाचे महत्व -

आज रोजी संसदीय कामकाजाकडे पाहिले असता काम कमी गदारोळ जास्त असल्याचे आपल्या लक्षात येते. याबद्दल देशातील अनेक विचारवंताना चिंता व्यक्त करताना आपण पाहतो. तेंव्हा डॉ.जनार्दन वाघमारे यांचे संसदीय कार्य करण्याची शैली मार्गदर्शक असल्याने तीचे विश्लेषण करणे महत्वाचे ठरते.

६. डॉ.जनार्दन वाघमारे यांची राज्यसभा सदस्य म्हणुन निवड

डॉ.जनार्दन वाघमारे शिक्षणतज्ञ, प्राचार्य , कुलगुरु व विचारवंत लेखक म्हणुन महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत निवृत्तीनंतर त्यांनी राष्ट्रवादी कॅाग्रेस तर्फे लातूरचे नगराध्यक्ष म्हणुन ही नावलौकीक मिळवला. त्यांच्या ह्या चौफेर ज्ञानाचा राष्ट्रहितासाठी उपयोग व्हावा या दृष्टीकोनातून राष्ट्रवादी कॅाग्रेसचे अध्यक्ष मा.शरद पवार यांनी त्यांना राज्यसभेच्या सदस्यत्वासाठी संधी दिली. डॉ.जनार्दन वाघमारे यांची १९ मार्च २००८ रोजी विधानसभा सदस्यांनी मतदानाद्वारे राज्यसभा सदस्य म्हणुन निवड केली. १५ एप्रिल २००८ रोजी त्यांनी राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. १५ एप्रिल २००८ ते १४ एप्रिल २०१४ असा त्यांचा राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाल आहे.

७. डॉ.जनार्दन वाघमारे यांचे संसदीय कार्य

डॉ.जनार्दन वाघमारे यांनी संसद सदस्य म्हणुन केलेल्या कार्याचे विश्लेषण खालील मुद्दयांच्या आधारे केले आहे.

अ. प्रश्नोत्तराच्या तासातील सहभाग

प्रश्न विचारणारा सदस्य सत्ताधारी बाकावरचा असो अथवा विरोधी बाकावरचा प्रश्नाच्या माध्यमातून सरकारला तो धारेवर धरु शकतो. डॉ.जनार्दन वाघमारे यांनी त्यांच्या सहा वर्षाच्या कालावधीमध्ये सुमारे दोन हजार प्रश्न सभागृहात विचारले. ते अनेकविध विषयांशी संबंधित होते. शेती, शिक्षण, उद्योग, सहकार, पाणी, पर्यावरण, रस्ते, रोजगार हमी योजना ,आरोग्य, सामाजिक न्याय ,कुपोषण , विज, सौरऊर्जा, संरक्षण , परराष्ट्र धोरण, इथेनॉल, नद्यांची जोडणी, नगरांचा विकास ,ग्रामीण विकास, पंचायत राज, महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्प, मुंबईचा विकास, संस्कृतिक धोरण, मागास भागांचा विकास, पर्यटन, सिमा भागातील मराठी भाषीकांचा प्रश्न, कश्मिरी पंडितांचा प्रश्न, समावेशी समाज, रॅगींग, महागाई, भ्रष्ट्राचार, मागास भागांचे औद्योगीकरण, रेल्वे लाईनचे रुंदीकरण, औषधांची भेसळ, हिंदी भाषेचा वापर, त्रीभाषा सुत्र, प्राथमिक शिक्षणाची हेळसांड, अन्न प्रक्रिया ,ठिबक सिंचन, विद्यापीठामधील प्राध्यापकांची भरती अशा अनेकविध विषयांशी ते संबंधित होते. अशा सर्वांगीण विषयांवार त्यांनी प्रश्न विचारले.

ब.विशेष उल्लेख या संसदीय कामकाज उपक्रमातील सहभाग

सभागृहात शुन्य प्रहर हा प्रश्नोत्तराच्या प्रहरानंतर लगेचच हा कार्यकाल असतो. त्यातच विशेष उल्लेख सादर करावयाचे असतात. संबंधित खात्याच्या मंत्र्याना त्याची दखल घ्यावी लागते. डॉ.जनार्दन वाघमारे सरांनी दारिद्र्य व कुपोषण, गुन्हेगारीचे वाढते प्रमाण, प्रत्येक क्षेत्रातील नोक-यांमध्ये स्थानिक लोकांना प्राध्यान्य, समावेशी समाजाचा संतुलीत विकास, रोजगारचा अधिकार, भ्रष्ट्राचाराची सार्वत्रिकता, शेतक-यांच्या शेतावर रोजगार हमी

योजना राबवा. पूर्वेकडे पाहण्याचे धोरण, समावेशक समाज : स्वप्न की वास्तव , कोणासाठी शिक्षण आणि कशासाठी शिक्षण, प्राचिन स्मारकांचे संरक्षण व संवर्धन, केंद्र व राज्य संबंध, आघाडीचा धर्म व आघाडीचे कर्म, शिक्षणाचा अधिकार, विकासासाठी मुंबईचा विकास व आक्रोश , सुशासनाची आवश्याकता, आमच्या शाळा खाटीकखाणे होऊ नयेत, आमचे संस्कृत धोरण, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकीकरण, भारत नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेला देश, नद्या जोडण्याची आवश्यकता, आरक्षण समावेशक समाजनिर्मितीचे प्रभावी साधन, पेचप्रसंगात सापडलेली भारतीय लोकशाही, पाण्याचा अभाव एक राष्ट्रीय समस्या, शेतक-यांच्या आत्महत्या, नव्या मुंबईचे विमानतळ, भ्रष्ट्राचाराविरुद्ध लढा आम्ही चाललोत कोठे? असे अनेक उल्लेख करत त्यांनी जन सामान्यांच्या प्रश्नांना वाट मोकळी करुन दिली.

क.राज्यसभेत सादर केलेली विधेयके-

डॉ.जनार्दन वाघमारे यांनी एकुण सहा विधेयके सादर केली. ती अशी

१.The compulsory pre-marital HIV test and other measures bill ,2010

२.The Prevention and eradication of Ragging bill ,2011

३.The Prevention of Dreadful Superstitions Practice Bill 2011

४.The Inter cast married couples and their children (reservation in post and services) bill,2011

५.The constitution (amendment) Bill 2013 (Fundamental Right to work)

६.The national farmers security bill 2013

वरिल विधेयकांपैकी फक्त एकच विधेयक The Prevention and eradication of Ragging bill ,2011 चर्चेस सभागृहाच्या पटलावर आले. त्यावर सभागृहात चर्चा झाली. परंतु, पुढे संदर्भीय विषयावर सरकार गंभीर असल्याचे तत्कालीन राज्यमंत्री यांनी सांगीतल्यामुळे सदरील विधेयक डॉ.जनार्दन वाघमारे यांनी परत घेतले.

ड. संसदीय समितीतील कार्य

डॉ.जनार्दन वाघमारे यांनी विविध १५ समित्यांवर काम केले. त्यापैकी सलग पाच वर्षे ते मानव संसाधन विकास स्थायी समितीवर सदस्य म्हणुन होते. या समित्यांमध्ये त्यांनी एक अभ्यासपुर्ण मूलभुत स्वरुपाचे विचार मांडूण योगदान दिले आहे. त्यांनी राष्ट्रसंघाच्या ६४ व्या अधिवेशनात सहभाग नोंदवला. भारताच्या वतीने त्यांनी support by the united nations system of the efforts of governments to promote and consolidate new or retorted democracies. याविषयावर स्टेटमेंट सादर केले. राज्यसभेत राष्ट्रवादी कॅाग्रेस पक्षाचा प्रदोत म्हणुन त्यांनी महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. त्यांची सभागृहातील उपस्थिती सरासरी ७६% होती.

८. संसदीय सदस्यत्वाची सामाजीक, आर्थिक, सार्वजनिक जीवनासाठीची उपयुक्तता -

राज्यसभा सदस्याचे कार्यक्षेत्र हे संपुर्ण महाराष्ट्र असते. डॉ .जनार्दन वाघमारे यांनी सहा वर्षाच्या काळात अनेक सार्वजनिक कार्य केली. त्यातील लातूर जिल्हासाठी केलेली काही ठळक कार्ये. १२४ कॅन्सर व हृदयरुग्णांना पंतप्रधान सहाय्यता निधिमधुन आर्थिक साहाय्यता मिळवून दिली. लातूरच्या रेल्वेस्टेशनवर आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध केल्या. उदगीर

रेल्वेस्टेशनच्या विकासासाठी २ कोटींचा निधि मंजुर करवुन घेतला. त्यातून उदगीर रेल्वेस्टेशनचा कायापालट झाला. सभागृहात मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रकल्पांविषयी वारंवार बोलून, संबंधित मंत्र्यांशी पत्र व्यवहार करुन नांदेड-लोहा-अहमदपुर-लातूररोड हि नविन रेल्वेलाईन त्यांनी मंजूर करवून घेतली. एक गाव एक स्मशानभूमी हे तत्व समोर ठेवुन १९ गावांना त्यांनी स्मशानशेड साठी निधी दिला. रस्त्यांच्या कडेला प्रवाशांच्या सोयीसाठी प्रवाशी थांबे बांधुन दिले. रेणापुर तालुक्यातील व्हिरी ते कारेपुर हि जलवाहिनी बदलुन नवीन जलवाहीनी करुन घेतली. तसेच जलशुद्धिकरण केंद्र ते गोपाळवाडी पर्यंत जलवाहीनीसाठी डॉ.जनार्दन वाघमारे यांनी प्रयत्न करुन निधी मंजूर करुन घेतला. त्यांनी केंद्रिय संस्कृत विद्यापीठ स्थापनेसाठी प्रयत्न केले. डॉ.जनार्दन वाघमारे यांनी आलेला निधी प्रामाणिकपणे खर्च केला व त्याचा अहवाल जनतेस सादर केला.

११.निष्कर्ष-

डॉ.जनार्दन वाघमारे यांनी त्यांच्या सहा वर्षाच्या कार्यकाळात विवध विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करुन अनेक प्रश्न विचारले, विशेष उल्लेख सादर केले, विविध समित्यांमधून लोकशाही शासन व्यवस्था व संसदीय प्रणालीस हातभार लावला. सरांच्या अभ्यासपूर्ण कार्यशैलीने शासनाच्या अनेक समस्या सोडवण्यास मदत झाली. म्हणुन आपण म्हणु शकतो की, डॉ.जनार्दन वाघमारे यांचे कार्य लोकशाहिभिमुख ,पारदर्शक व उत्तम नेतृत्वाप्रमाणे आहे. तसेच ते मा. शिवराज पाटिल चाकूरकर यांच्या अनुभवातुन आपल्या समोर येते.

मा. शिवराज पाटिल चाकूरकर डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या विषयी लिहीतात, "डॉ.जनार्दन वाघमारे यांची भाषणे व विचार ऐकण्याची संधी मला मिळाली. त्यांची भाषणे गंभीर स्वरुपाची व दूरगामी विचारांनी भरलेली असत. ते इंग्रजी व हिंदी भाषेत बोलत असत. दिलेल्या वेळेत विचार मांडीत असत. केव्हाही राज्यसभेच्या नियमांचे त्यांनी उल्लंघन केले नाही. त्यांची भाषणे ऐकण्याकरिता सभासद मुद्दाम राज्यसभेत उपस्थित राहत असत. राज्यसभेच्या चर्चेचा स्तर त्यांच्या भाषणाने उंचावला गेल्याचा भास आम्हाला होई. आम्हाला त्याबद्दल गौरव वाटत असे. संसदेच्या सदस्यांने काम कसे करावे? असे कोणी विचारले तर ते डॉ जनार्दन वाघमारेंनी ज्या पध्दतीने केले, त्या पध्दतीने करावे, असे जाणकार संसद सदस्यास म्हणता येवु शकेल."

१२.संदर्भ ग्रंथ -

१. माय डेज इन पार्लमेंट- डॉ.जनार्दन वाघमारे. (सुगावा प्रकाशन, पुणे. वर्ष २०१७)

२. यमुणेचे पाणी - डॉ.जनार्दन वाघमारे (पद्मगंधा प्रकाशन, पुणे. वर्ष २०१८)

३. डॉ.जनार्दन वाघमारे यांचा राज्यासभा सदस्यत्वाचा अहवाल (३ एप्रिल २००८ ते २ एप्रिल २००१४ राष्ट्रवादी कॅाग्रेस पक्ष )

४. डॉ.जनार्दन वाघमारे यांची मुलाखत दि.१२ फेब्रुवारी २०१९

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded